# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५
## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)**

(१) **सर्वश्री. अतुल भातखळकर, चेतन तुपे, सुनिल प्रभू, अजय चौधरी, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. मोहन मते, मनोज जामसुतकर, सुरेश धस, श्रीमती सना मलिक, श्री. महेश सावंत, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. संजय देरकर, सिध्दार्थ खरात, मुरजी पटेल, अमिन पटेल, अस्लम शेख, श्रीमती ज्योती गायकवाड, श्री. विकास ठाकरे, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद खान पठाण, अमित विलासराव देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ मुंबई वरुन कर्जतकडे आणि कसारा येथून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या दोन जलद लोकल मुंब्रा स्थानकाच्या नजीकच्या वळणावर परस्परांशी झालेल्या घर्षणामुळे लोकलच्या दरवाज्यात लटकून प्रवास करणारे १३ प्रवासी खाली पडून झालेल्या अपघातात ४ प्रवाशांचा मृत्यू तर ९ जण जखमी झाल्याची दिनांक ९ जून २०२५ रोजी घडलेली धक्कादायक घटना, मुंबईतील रेल्वेतील गर्दीत नागरिक जीव मुठीत घेऊन प्रवास करीत असणे, कधी चेंगरा-चेंगरीत तर कधी रेल्वे मार्ग ओलांडताना नागरिक मृत्युमुखी पडत असणे, मध्य रेल्वेवर सर्वाधिक अपघात मृत्यू ठाणे - कल्याण मार्गावर झालेले असणे, सन २०२४ मध्ये धावत्या लोकलमधून ठाणे ते कल्याण दरम्यान ६१० जणांचा मृत्यू होणे, गेल्या ३ वर्षात मुंबई लोकलच्या प्रवासादरम्यान ७५६० प्रवासी मृत्युमुखी पडले तर ७२९३ जण जखमी झाल्याच्या घटना घडणे, मुंबईतील मध्य व पश्चिम रेल्वेची गर्दी कमी करुन वाढते अपघात रोखण्यासाठी सरकारी व खाजगी कार्यालयीन वेळेत बदल करण्याबाबत शासनाने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई शहरातील खासगी व सार्वजनिक कार्यालयांच्या कार्यालयीन वेळा टप्प्याटप्प्याने निश्चित करण्याकरिता धोरण आखून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बुलढाणा जिल्ह्यात शेगाव - खामगांव महामार्गावर दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास तीन वाहनांची धडक होऊन झालेल्या अपघातात सहा जण जागीच ठार तर २४ प्रवासी गंभीर जखमी होणे, जखमींवर खामगांवमधील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असून त्यातील सात जणांची प्रकृत्ती चिंताजनक असणे, सदर मार्गावर अपघाताचे वाढलेले प्रमाण, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, या अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३)**

**(३) सर्वश्री. नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, साजिद खान पठाण, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. संजय मेश्राम, राजकुमार बडोले, विकास ठाकरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भातील सहा जिल्ह्यातील झुडपी जंगलांना वनक्षेत्र घोषित करुन ८६ हजार हेक्टर क्षेत्र महसूल विभागाने वन विभागाला हस्तांतरीत करण्यात येणार असल्याची बाब माहे जून, २०२५ च्या दरम्यान उघडकीस येणे, यामुळे या जमिनीला डिनोटीफाय करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाला मोठा धक्का बसणे, या निर्णयामुळे पूर्व विदर्भातील लाखो कुटूंबे बेघर आणि भूमीहिन होण्याचा धोका निर्माण होणे, नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये विकासकामे आणि प्रकल्प उभारणे अशक्यप्राय होणार असून उद्योग धंदे नसल्याने स्थानिक तरुण रोजगारापासून वंचित होण्याची निर्माण झालेली भिती, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुर्नविचार याचिका दाखल करुन सहारिया कमिटीने दिलेल्या अहवालाप्रमाणे राज्य शासनाची बाजू भक्कमपणे मांडून करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर शहराची हद्दवाढ आणि कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण असे दोन विषय कोल्हापुरात चर्चेत असणे, शहराच्या हद्दवाढी संदर्भात मा. मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत शहरालगतच्या आठ गावांचा समावेश करण्याच्या सूचना करण्यात आल्या असणे, कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने दोन्ही विषय महत्त्वाचे असणे, हद्दवाढीचे यापूर्वी अनेक प्रस्ताव जाणे, शहराचा आजपर्यंत अपेक्षित विकास झालेला नसणे, या परिस्थितीत आम्हाला हद्दवाढीत कशाला घेता अशी भूमिका हद्दवाढीला विरोध करणाऱ्या गावांची असणे, हद्दवाढीला पर्याय म्हणून २०१७ ला ४२ गावांचा समावेश करुन कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना झाली असणे,

परंतु प्राधिकरणाच्या स्थापनेपासून कार्यक्षेत्रातील गावांच्या विकासासाठी शासनाकडून वेगळा विकास निधी अद्याप आलेला नसणे, प्राधिकरण कार्यालय सक्षमपणे काम करीत नसणे, कार्यालयाची वेळ, शिस्त, बांधकाम परवाने अशा अनेक समस्या निर्माण होणे, प्राधिकरणामुळे नागरी वस्त्यांमध्ये वाढ झालेली असणे, वाढत्या नागरिकीकरणामुळे प्राधिकरणातील आणि कोल्हापूर शहर लगतच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे होत असणे, यासाठी कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाचा विचार करता ४२ गावांचा विकास आराखडा करणे गरजेचे असणे, नाशिक, पुणे, पिंपरी चिंचवड विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर मूलभूत सुविधांसह शिक्षण, उद्योग, करमणूक केंद्रे, रस्ते, क्रीडांगण, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री. महेश सावंत, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील माहीम येथील मोरी रोड येथील तळ + ०३ मजल्यांची मराठी, उर्दू, इंग्रजी माध्यमांची शाळा सन २०२० पासून बंद असणे, शाळेची इमारत अत्यंत धोकादायक असल्याने २०२४ मध्ये इमारत जमीनदोस्त करण्यात येणे, शालेय वर्ष २०२५-२६ सुरु होऊनही अजूनही शाळेचे बांधकाम सुरु न होणे, सदर बंद शाळेचे उर्दू शाळा क्र. १ आणि २ शाळेचे वर्ग नजीकच्या आर. सी. चर्च माहीम येथे भरत असणे, इतर मराठी आणि इंग्रजी शाळा बंद असणे, तेथील विद्यार्थ्यांचे कुठे स्थलांतरण केल्याची माहिती नसणे, पूर्वी तेथे १५०० विद्यार्थी असून आता १२०० ते १५०० इतकी कमी झालेली असणे, तसेच माहीम येथील कानोसा हायस्कूल येथील न्यू माहीम मनपा शाळा मराठी, हिंदी, कन्नड, इंग्रजी अशी प्राथमिक आणि माध्यमिक शाळा तळ मजला ते ०३ मजल्याची इमारत असणे, सदर शाळेची देखील दुरवस्था झालेली असून इमारत डिसेंबर, २०२४ मध्ये C-1 कॅटेगरी मध्ये जाहीर करण्यात येणे, इमारत मोडत असणे, शाळेतील २००० विद्यार्थ्यांचे नुकसान होत असणे, अशाप्रकारे माहीम मधील दोन्ही शाळेतील शालेय विद्यार्थ्यांचे अक्षम्य नुकसान होत असणे, यामुळे विद्यार्थी आणि पालकांचे होणारे नुकसान आणि हाल, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरत असलेली नाराजी आणि असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. शांताराम मोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भिवंडी तालुक्यातील येवई-चिंचवली-पाच्छापुर तानसा पाईप लाईन रस्ता बृहनमुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असणे, सदर रस्त्याचे वारंवार कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी होत असणे, परंतु सदरील रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण करुन महापालिकेच्या पैश्यांचा भ्रष्टाचार करुन अपव्यय केला जात असणे, सदर रस्त्याचे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना व सभोवतालच्या सुमारे ३० ते ४० गावातील नागरिकांना कोणताही पर्यायी रस्ता नसून पाईप लाईन रस्ता दळण - वळणासाठी एक मार्ग असणे, महानगरपालिकेद्वारे हा रस्ता नेहमी सुव्यवस्थित वापरात ठेवणार असल्याचे सांगण्यात आलेले असतानाही रस्त्याची अतिशय

दयनीय अवस्था झालेली असणे, रस्त्यावर जागोजागी भले मोठे खड्डे पडून रस्ता नादुरूस्त झालेला असणे, परंतु महानगरपालिकेचे याबाबत अक्षम्य दुर्लक्ष असून रस्ता कॉंक्रीट करण्यास टाळाटाळ करणे, गेले कित्येक वर्षे रस्त्याची अतिशय बिकट अवस्था असणे, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना वारंवार सदरहू बाब निदर्शनास आणूनही अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, ही अत्यंत गंभीर बाब असून यासंदर्भात उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणारे संबधित अधिकारी/कर्मचारी, ठेकेदार आदिंसह अन्य दोषींविरुद्ध कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(७) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"जळगांव शहरातील विविध भागांत महानगरपालिकेमार्फत अलीकडच्या काळात करण्यात आलेली रस्त्यांची कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची, तांत्रिक मानकांना न धरलेली व ठेकेदार-महापालिका अधिकाऱ्यांच्या संगनमतातून झालेली असणे, रस्ते पूर्ण केल्यानंतर काही आठवड्यांतच तडे जाणे, खचणे, सिमेंट-डांबरी थर उखडणे असे प्रकार सातत्याने घडत असणे, काही ठिकाणी गटारींच्या व इतर खोद कामानंतर रस्ते पुनर्बांधणी न करता उघडे ठेवले जात असणे, त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली असणे, पावसाळ्यात रस्ते जलमय होऊन नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होत असणे, रुग्णवाहिका, शाळेची वाहने, अग्निशमन गाड्या यांच्यावर परिणाम होत असणे, जळगांव महापालिकेमार्फत योग्य पद्धतीने कामांचा दर्जा न तपासता ठेकेदारांची देयके अदा करण्यात येत असणे, प्रत्यक्ष रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट असणे, नागरिकांकडून वारंवार तक्रारी, स्थानिक वृत्तपत्रांतून वारंवार प्रसिद्धी, तरीही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसणे, यामुळे सार्वजनिक पैशांचा अपव्यय व भ्रष्टाचार झाल्याची शक्यता असून नागरिकांच्या जीवितास व दैनंदिन जीवनास धोका निर्माण झाला असणे, यामध्ये महापालिकेमार्फत करण्यात आलेल्या व येत असलेल्या रस्ते कामांची तांत्रिक व आर्थिक चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. विजय शिवतारे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"सन १८७८-७९ साली स्थापन झालेल्या पुणे जिल्ह्यातील सासवड आणि जेजुरी या नगरपालिकांमध्ये मलनि:स्सारण व्यवस्था नसणे, मलनि:स्सारण व्यवस्था नसल्यामुळे शहरांमध्ये अस्वच्छता, उघड्यावर येणारे सांडपाणी, शहरात दुर्गंधी आणि घाणीचे साम्राज्य पसरणे, परिणामी साथीच्या रोगांचा वारंवार प्रादुर्भाव होणे, सासवड शहरातील भुयारी गटार व्यवस्थेचे काम सन २०१८ साली मंजूर होणे, अर्धवट अवस्थेत संबंधित ठेकेदाराने हे काम सोडल्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून काम ठप्प असणे, वारंवार नोटिसा देऊनही ठेकेदाराने काम न करणे, त्यामुळे संबंधित ठेकेदारास ब्लॅकलिस्ट करून पुन्हा फेरनिविदा प्रक्रिया राबविण्याची गरज निर्माण होणे, अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या खंडोबारायाच्या जेजुरीत भुयारी गटार व्यवस्था अद्याप मंजूर नसणे, भुयारी गटार व्यवस्थेचा प्रस्ताव अद्याप तांत्रिक मान्यतेच्या स्तरावरच असणे, वर्षानुवर्ष जेजुरी शहराला

अस्वच्छतेचा विळखा असणे, देश आणि राज्यभरातून येणाऱ्या भाविकांमध्ये शहरातील घाणीमुळे तीव्र नाराजी असणे, सासवड आणि जेजुरी शहरात रस्त्यांचीही दुरवस्था असणे, राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सासवड शहराच्या टप्पा क्रमांक २ आणि जेजुरी शहराच्या भुयारी गटार योजनेस निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, दोन्ही शहरांच्या हद्दीत झालेली वाढ, परिणामी रस्त्यांनाही नगरोत्थान महाअभियान मधून तरतूद आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(९) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे येथील भोसरी येथील पिंपरी औद्योगिक क्षेत्रात महिला उद्योजकांना सामुहिक गटासाठी भुखंड क्र. बीजीपी-१०७ रुक्मिणी महिला इंजिनिअरींग असोसिएशन, भोसरी पुणे या संस्थेस वाटप करण्याबाबत त्यांनी शासनाकडे अनेकदा मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, रुक्मिणी महिला इंजिनिअरींग असोसिएशन ही संस्था सुक्ष्म, लघू उपक्रम - समुह विकास योजनेतंर्गत (MSE-CDP) महिला इंजिनिअरींग क्लस्टर, भोसरी महाराष्ट्र, पुणे या प्रकल्पास राज्य सरकारची मान्यता असून एम.आय.डी.सी. औद्योगिक क्षेत्रात जागा वाटप केल्यावर सदरच्या रुक्मिणी महिला इंजिनिअरींग असोसिएशन यांना केंद्र सरकारची मान्यता प्राप्त करणे शक्य असणे, याबाबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग सारथी अंधेरी (पुर्व) यांच्याकडे सदर प्रकल्पास सामाईक सुविधा केंद्र (CFC) उभारणीसाठी एम.आय.डी.सी. विभागाकडे प्लॉट मिळण्याबाबत मागणी केलेली असूनही अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने या संस्थेतील सदस्यांमध्ये व स्थानिक नागरिकांत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१०) श्री. नारायण कुचे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र राज्य माथाडी मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे शेंद्रा एमआयडीसी अंतर्गत पर्किन्स कंपनी मध्ये बोगस १७ माथाडी कामगारांची अधिकाऱ्यांच्या संगनमताने नोंदणी करणे, नोंदणी केलेल्या १७ माथाडी कामगारांपैकी ११ कामगार हे गाझीयाबाद दिल्ली, मुंबई व आंबेजोगाई या शहरातील असणे, नोंदणी झालेल्या माथाडी कामगारांपैकी राघव सुनील शर्मा हा धार्मिक सत्संग कार्यक्रम करणारा असणे, तसेच यासीन मुस्ताक शेख व मुस्ताक नजीर शेख हे हॉकर्स एसटी महामंडळ परवानाधारक असणे, गणेश काकडे यांनी पर्किन्स कंपनी व मेटॅलिस्ट फोर्जिन या दोन्ही कंपन्यांमधून एकाच वेळेस माथाडी कामगार म्हणून वेतन घेतल्याचे उघडकीस येणे, माथाडी कामगार म्हणून नोंदणी करून बोगस बिल उचलल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये माथाडी मंडळातील तत्कालीन अध्यक्ष सचिव व तसेच शेंद्रा निरीक्षक यांच्या संगनमताने खोटी हजेरी पत्रक तयार करून, बोगस बिले उचलण्याचे उघडकीस येणे, हा गैरव्यवहार सुरू असल्याने यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** : डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** : सन २०२३-२०२४ चे ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / पालघर / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव/ अहिल्यानगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / छत्रपती संभाजीनगर / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / धाराशिव / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : औचित्याचे मुद्दे**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहर, उपनगर व राज्यातील इतर शहरांमध्ये इमारतींचा पुनर्विकास सुरु असताना तात्पुरते घर बदलावे लागत असल्याने पासपोर्ट प्रक्रियेत विशेषत: पत्ता व्हेरिफिकेशन अडचणी निर्माण होणे, दरम्यानच्या कालावधीत विकासक व घरमालक यांचेसोबत करार होऊन तात्पुरत्या स्वरुपासाठी घरमालकांना इतरत्र ठिकाणी भाडे करारावर राहण्यास जावे लागत असणे, दरम्यान एखाद्या विद्यार्थ्यांला उच्च शिक्षणासाठी परदेशात जावे लागत असल्यास, पासपोर्ट काढावयाचा असल्यास तेथील इमारतीचा पुनर्विकास सुरु असल्यामुळे अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असणे, यातील एक मोठी समस्या म्हणजे पासपोर्ट व इतर अधिकृत कागदपत्रांसाठी पत्ता पोलिस प्रमाणीकृत करता येत नसणे, विशेषत: पत्ता व्हेरिफिकेशन रद्द/विलंब, Society NOC सारख्या अति मागण्यांमुळे नागरिकांना गैरसोय निर्माण होत असणे, पुनर्विकासामुळे निर्माण होणाऱ्या घराचा पत्ता बदलाच्या

अडचणींना शासनाने डिजिटल सुविधा, मानकीकृत व्हेरिफिकेशन, त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि पुनर्विकास-पत्ता विशेष जपण्याचे धोरण अवलंब करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) सर्वश्री. देवेंद्र कोठे, अनुप अग्रवाल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नंदूरबार जिल्हयातील अक्कलकुवा येथे जामीया इस्लामीया इशातूल उलुम या नावाची इस्लामिक संस्था असणे, ही संस्था इस्लामिक धार्मिक शिक्षण देणारी शाळा म्हणजेच मदरसा असणे, या संस्थेमध्ये येमेन या देशातील व्यक्ती व त्याचे कुटुंबिय हे त्यांची व्हिसाची मुदत दिनांक १९ फेब्रुवारी, २०१६ रोजी संपूनही, सदर मदरसामध्ये बेकायदेशीररित्या राहत असणे, विशेष म्हणजे या संस्थेच्या मदतीने ह्या येमेन देशातील व्यक्तींनी भारताचे ओळखीचे व रहीवासाचे पुरावे जसे की, आधारकार्ड, पॅनकार्ड, जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र इत्यादी बोगस कागदपत्रे तयार केलेले असणे, याबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी अक्कलकुवा पोलीस स्टेशनमध्ये सदर येमेन देशातील व्यक्ती तसेच या मदरसाचे संस्थापक व अध्यक्ष यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झालेला असणे, परंतु या गुन्हयातील आरोपी मदरसाचे संस्थापक व अध्यक्ष या आरोपींना अटकपूर्व जामीन होणे, सदर मदरसामध्ये विदेशी निधीव्दारे राष्ट्राच्या सुरक्षेला धोका पोहचेल असे कामकाज सुरु असणे, त्याअनुषंगाने या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वात एस.आय.टी. नेमण्याची आवश्यकता असणे, संस्थेची मान्यता रद्द करणे, संस्थेने नियमबाहयरितीने आदिवासींची बळकावलेली जमीन परत करण्याची गरज असणे, तसेच संस्थेने शिष्यवृत्तीमध्ये देखील भ्रष्टाचार केलेला असणे, सदर प्रकरणात विशेष सरकारी वकील नियुक्त करणे आवश्यक असणे, तसेच आरोपींच्या अटकपूर्व जामीनास आव्हान देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(३) सर्वश्री शंकर मांडेकर, सुनिल शेळके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई पुणे द्रुतगती राष्ट्रीय महामार्ग क्र ४८ वर दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असणे. त्यापैकी मावळ तालुक्यातील शिळफाटा ते भक्ती शक्ती चौक, निगडी या हद्दीमध्ये वरसोली व सोमाटणे टोल नाका हे दोन टोल नाके कार्यरत असणे, शासनाच्या नियमानुसार दोन टोल नाक्यांमध्ये ६० किलोमीटरचे अंतर असणे आवश्यक असताना सद्यस्थितीत या २ टोलनाक्यांमध्ये अवघे ३१ किलोमीटरचे अंतर असणे, त्यामुळे सदर टोलनाका बेकायदेशीर असल्याचे स्थानिकांचे मत असून याप्रकरणी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली असणे, सेवा रस्त्याचा अभाव, अपुरे नियोजन यामुळे होत असलेली प्रचंड वाहतूक कोंडी व वाहनांच्या लांबचलांब रांगा यांसारख्या अनेक गंभीर समस्या निर्माण होणे,

सन २००६ साली सुरू झालेल्या सोमाटणे टोल नाक्याची सन २०१९ मध्ये मुदत संपल्यावर सदर टोल नाका बंद होणे अपेक्षित असतांना देखभाल व दुरुस्तीचे कारण देऊन अपेक्षेपेक्षा जास्त पटीने टोल वसूल करण्यात आले असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, सदर टोलनाक्यांवर होत असलेली प्रचंड वाहतूक कोंडी तसेच सदर टोलनाके कायमस्वरूपी बंद व्हावेत याकरिता स्थानिकांकडून वारंवार होत असलेली मागणी, परिणामी शासनाविषयी जनमानसांत पसरलेली तीव्र नाराजी, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. मुरजी पटेल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रेमनगर एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था विलेपार्ले (पश्चिम) मुंबई येथील आठ वर्षांपूर्वी खोल्या पुनर्विकास करण्यासाठी देण्यात येणे, त्यावेळी सदर खोल्यांचे दोन वर्षांचे भाडे देऊन खोल्या ताब्यात घेऊन तोडण्यात येणे, सहा वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी सदर खोल्यांचे भाडे देण्यात न येणे, सध्या या रिकाम्या जागेवर बांधकाम करुन सदर खोल्या या काही राजकीय व्यक्तीच्या सहकाऱ्यांकडून गृहनिर्माण संस्थेच्या प्रवर्तकांना २५ लाख रुपयांना विकण्यात येणे, झोपडपट्टीतील खोल्या या तत्कालीन राजकीय व्यक्ती व विद्यमान लोकप्रतिनिधींच्या संगनमताने स्थानिक गोर-गरीब खोलीधारकांना दमदाटी करुन खोल्या परस्पर विक्री करीत असणे, या झोपडपट्टी माफियांच्या नावे अनेक गुन्ह्यांची जुहू, खार आणि सांताक्रुज पोलीस ठाण्यात नोंद असणे, परिणामी सदर सदनिका धारक व झोपडपट्टीधारकांत भितीचे वातावरण पसरणे, त्यामुळे विलेपार्ले येथील झोपडपट्टी माफियांविरुद्ध कारवाई करुन स्थानिक सदनिका धारकांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रीया."

(५) **श्री. किसन वानखेडे, ॲड. श्रीजया चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भातील दुष्काळी, डोंगराळ व आदिवासी भाग असलेल्या यवतमाळ जिल्हयातील अंदाजे १२२४० हे. क्षेत्रास सिंचन लाभ देण्यासाठी सहस्त्रकुंड प्रकल्प प्रस्तावित असणे, या प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता दि. २०.७.२००९ च्या आदेशान्वये रु. ५८३ कोटी किंमतीस देण्यात येणे, तथापि या कामास १६ वर्षाचा कालावधी होऊनही अद्याप सुरुवात न करणे, दरम्यानच्या काळात या प्रकल्पाच्या आराखडयात बदल झालेला असून त्या बदलानुसार सु.प्र.मा. प्रस्ताव तयार करुन तो तांत्रिक छाननीसाठी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडे दि. १६.६.२०२५ च्या पत्रान्वये सादर करणे, या प्रकल्पामुळे नांदेड व यवतमाळ जिल्हयातील अंदाजे ३२००० हे क्षेत्र सिंचनाखाली येणार असून २०५ दलघमी पाणीसाठा निर्माण होणार असणे, या डोंगराळ व आदिवासी भागातील जनता, पाळीवप्राणी व वन्य प्राणी यांना मोठा दिलासा मिळणार असणे, या प्रस्तावास

तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**(६) श्री. प्रताप अडसड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बेंबळा प्रकल्पाकरिता शासनाने संपादित केलेल्या जमीन व संत्रा झाडांचे दिवाणी न्यायालयाचे निकाला विरुद्ध VIDC, नागपूर यांनी मा. उच्च न्यायालय नागपूर येथे अपील क्र.१४२/१८ मध्ये आपसी तडजोड करून त्वरित निकाली काढण्याकरिता VIDC, नागपूर यांच्याद्वारे संपादित शेत जमीन व संत्रा झाडांचे शासनाने अत्यल्प मोबदला दिल्याने दिवाणी न्यायालयात LAC नंबर ८७/०८ दाखल केले असणे, न्यायालयाने जमिनीचा दर रुपये ४०००००/- प्रति हेक्टरी व संत्रा झाडाला रुपये ८ ते ९ हजार असा दिला असणे, VIDC ने रुपये ४०२०००/- प्रति हेक्टरी हंगामी ओलीताचा निकाल नो अपील घोषित केला असणे, त्यामुळे दिवाणी न्यायालयाने दिलेला निकाल रुपये ४०००००/- हेक्टरी तडजोडीने निघू शकणे, तसेच संत्रा झाडाचा निकाल मा.न्यायालयाने रुपये ८०००/- प्रति झाड मंजूर केला असणे, त्याचा अपील नंबर ४६९/१२ असणे, हाच निकाल सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील नंबर ६९१४/२१ दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी कायम ठेवला असणे, त्यामुळे संत्रा झाडांना जो रुपये ८०००/- प्रति झाड दर दिवाणी न्यायालयाने दिला तो घेण्यास तयार असणे आणि ज्या संत्रा झाडाला रुपये ९०००/- दर दिला त्याचे रुपये १०००/- प्रति झाड सोडण्यास तयार असणे, तसेच VIDC, नागपूर यांनी या आधी फळझाडांची केस लोकअदालतमध्ये तडजोड करून निकाली काढली असणे. त्याचा अपील नंबर ३४०/१२ दिनांक १२ एप्रिल, २०१४ असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(७) श्री. किसन कथोरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील अनुदानित आश्रमशाळा वालीव्हरे येथील विद्यार्थ्याने दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी शाळेबाहेरील जंगलात जाऊन आंब्याच्या झाडाला गळफास लाऊन घेऊन आत्महत्या करणे, सदर अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचा सातत्याने छळ होत असून विद्यार्थ्यांना दैनंदिन आहारात दूध, अंडी, केळी महिन्यातून चुकून कधीतरी एकदाच मिळत असणे, परंतु दररोज दूध, अंडी, केळी देत असल्याचा अहवाल सादर करून अनुदान लाटण्यात येणे, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना गणवेश दिला जाणे परंतु त्यांचे पैसे सुद्धा पालकांकडून वसूल करण्यात येणे, शाळेत पूर्णतः चोरीची वीज वापरण्यात येणे, या अनुदानित आश्रम शाळेत पटसंख्या कमी असताना बोगस पटसंख्या दाखवून शासनाचे अनुदान लाटण्याचे काम संस्था करीत असणे, मेनू कार्ड प्रमाणे दुपारचे व संध्याकाळचे जेवण सुद्धा मिळत नसणे, त्यामुळे ठाणे व पालघर जिल्ह्यातील पालकांकडून तसेच सर्वसामान्य आदिवासी नागरिकांकडून वालीव्हरे येथील अनुदानित आश्रम शाळेत

गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या गंभीर घटनेची दखल घेऊन या संस्थेची त्रयस्थ समिती नेमून सखोल चौकशी करून या शाळेची मान्यता रद्द करणेबाबत मागणी जोर धरू लागली असणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजीनगर येथे अनुरक्षणगृह नसल्याने बालसुधारगृहातून इतर शहरात जाणेस मुलींचा प्रचंड तणावाने नकार असल्याची बाब दिनांक २५ जून, २०२५ रोजी निदर्शनास येणे, लहानपणापासून अनाथ मुलींना वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत बालसुधारगृह/बालिकाश्रमात ठेवण्यात येत असणे, तथापि १८ ते २८ वयापर्यंत त्यांना ज्या शहरात अनुरक्षण गृह उपलब्ध आहे अशा ठिकाणी स्थलांतरित करण्यात येत असणे, महिलांसाठी राखीव असलेल्या ठिकाणी स्थलांतरित करण्यात येत असून, अचानक त्यांचे शिक्षणावर व जीवनावर प्रचंड नकारार्थी तणाव येणे, मात्र मुलींसाठी बालकल्याण समिती याबाबतीत कुठलाच निर्णय घेऊ शकत नसणे, तसेच मराठवाड्यामध्ये छत्रपती संभाजी नगर शहरामध्ये तीन बालिका गृहे असणे, यात साधारण ३०० मुली गोरगरीब निराधार एकलपालक किंवा अपंग कैदी आदी पालकांच्या मुलींचा समावेश असणे, १८ ते २८ वयोगटातील अनाथ मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने काही मुलींकरिता वय १८ वर्षानंतरची आवश्यक असलेली अनुरक्षणगृह छत्रपती संभाजीनगर येथे निर्माण करण्याची आवश्यकता असणे, त्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(९) डॉ. नितिन राऊत, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर शहरातील कावरापेठ ते राजीव गांधीनगर (आर.ओ.बी.) उड्डाणपुलाचे दोषपुर्ण काम करण्यात आले असून त्याठिकाणी वाय कॅटेगीरीचा पुल हवा असणे, परंतु टी कॅटेगिरीचा दोषपूर्ण उड्डाणपुल निर्माण करण्यात आल्याने नागरीकांचे अपघात होत असल्याची बाब माहे जून २०२५ च्या दरम्यान उघडकीस येणे, या ठिकाणी बांधण्यात आलेला उड्डाणपुल उत्तर नागपूर व पूर्व नागपूरच्या कनेक्टीव्हिटीकरिता केला असतानाही या पुलाने उत्तर नागपूर व पूर्व नागपूरची कनेक्टीव्हिटी पूर्णपणे बाधित झालेली असणे, त्यामुळे उत्तर नागपूर मतदार क्षेत्रातील ८०% रहिवाश्यांना या पुलामुळे प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असणे, तसेच या पुलाची रुंदी एकसारखी नसल्याने म्हणजे कमीजास्त असल्याने तेथे अपघात सदृष्य स्थिती निर्माण झालेली असून अपघात सुद्धा होत असून त्यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे व भविष्यात मोठा अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता असणे, यामुळे स्थानिक जनतेत पसरलेले भितीचे वातावरण व असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन सदरच्या उड्डाणपुलाची रुंदी वाढविण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(१०) श्री. अतुल भोसले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामामुळे कराड शहरालगत उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात असणे, मात्र कामाच्या दिरंगाईमुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी, रुंदीकरणाच्या कामामुळे जागोजागी खोदकाम, महामार्गालगत मोठमोठे खड्डे, सुरक्षा रेलिंगचा अभाव, साईडपट्टीवर दगडांची मांडणी, अनावश्यक ठिकाणी बॅरिकेटस, ब्लिंकर्स, सबलर, इंडिकेटर्सची कमतरता, धोकादायक ठिकाणी फलकांचा अभाव, उपमार्गावर खड्याचे साम्राज्य, साचलेल्या पाणी, चिखलामुळे होणारी घसरण यामुळे प्रवाशांच्या जीवावर बेतणे, गत चार महिन्यापासून महामार्गावर तब्बल २२ अपघातामध्ये ७ जणांनी जीव गमावणे, सोळापेक्षा जास्त गंभीर जखमी होणे, सातारा ते कोल्हापूर ह्या १२० कि.मी. च्या प्रवासास साडेतीन तासांपेक्षा जास्त वेळ लागणे, एकाचवेळी सर्व ठिकाणी ही कामे केली जात असल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्यामुळे अपघातांमध्येही दिवसेंदिवस होणारी वाढ थांबविण्यासाठी वाहतूक नियंत्रणासाठी अधिक कर्मचारी, योग्य दिशादर्शक फलक, अपघात टाळण्यासाठी स्पीड ब्रेकर, पथदिवे उभारणी करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**सर्वश्री अभिमन्यू पवार, सुमित वानखडे, नारायण कुचे, सुरेश धस, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"राज्यातील नागरीकांचे जीवनमान शेतीवर अवलंबून असणे, विज्ञान युगात शेतीची मशागत ते कापणी आणि वाहतूक ही यंत्रावर अवलंबून असणे, शेतकऱ्यांना रस्त्यांची नितांत आवश्यकता असणे, शेत रस्त्यांचे मजबुतीकरण करण्याबाबत मोठ्या प्रमाणात मागणी असणे, शेतरस्त्यांअभावी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, राज्य सरकारची शेत रस्त्यांसाठीची प्रभावी योजना नसणे, मातोश्री शेत पानंद रस्त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, शेत/पानंद रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र धोरण करण्याची आवशक्यता असणे, नकाशावरील शेतरस्ते, पांदण/पानंद रस्ते, शिवरस्ते बंद असल्याची वादावादी आणि भांडणतंटे याची प्रकरणे महसूल व गृह विभागाकडे दाखल असणे, यांच्या नोंदी महसूल विभागाकडे असणे, राज्यातील ग्रामीण जिल्हा मार्ग रस्ते ग्रामविकास विभागाकडे, प्रमुख जिल्हा मार्ग व राज्य मार्ग रस्ते, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग रस्ते हे राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्या अधिनस्त असणे, यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष आणि निधी शासनाकडून दिला जात असणे, शेतरस्त्यांना दर्जा आणि लेखाशिर्ष नसणे, सर्व शेतरस्ते सांभाळण्याची जबाबदारी महसूल विभागास देण्याची व सदरील रस्ते सुधारणा आणि दुरुस्ती करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करणे आणि महसूल विभागास निधीची तरतूद करुन शेत रस्ता सुधारणा करण्याबाबत तसेच स्थानिक पातळीवर रस्ते कामांसाठी स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित खातेप्रमुख यांची समीती करणे याबाबत लोकप्रतिनिधी

यांची सातत्याने मागणी असणे, परंतु शासनाकडून या अत्यंत ज्वलंत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असणे, शेतरस्त्यांना दर्जा देणे आणि सर्व रस्ते महसूल विभागाकडे मालकी व संगोपनासाठी देऊन या रस्त्यांची सुधारणा व देखभाल दुरुस्ती कामांसाठी स्वंतत्र लेखाशिर्ष तयार करुन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयक :-**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५

**आठ : (मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ. संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ. किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते, राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ. तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके, सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने,**

**सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिध्दार्थ शिरोळे, राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्टयातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रिमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पद्धतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतक-यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**नऊ : (मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री अजय चौधरी, रोहित पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, सर्वश्री अमीन पटेल, दिलीप सोपल, रोहित पवार, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री उत्तमराव जानकर, अस्लम शेख, कैलास घाडगे-पाटील, संदिप क्षिरसागर, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री सुनिल राऊत, बापूसाहेब पठारे, अमित झनक, संजय पोतनीस, नारायण पाटील, विकास ठाकरे, नितीन देशमुख, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, राजु खरे, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिद्धार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील काही वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्याने या संस्थांवर प्रशासकाचे नियंत्रण असणे, त्यामुळे राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती या अंतर्गत येणाऱ्या शहरी भागात पायाभुत सुविधांचा बोजवारा उडाला असणे, लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे मनमानीपणे कारभार सुरु असणे, त्यामुळे या मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याची प्रकरणे उघडकीस येणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य मोबदला मिळत नसल्याने विकासाची अनेक कामे रखडलेली असणे, रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात निविदांची रक्कम वाढविल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होऊन सदरची कामे निकृष्ट दर्जाची झाली असणे, शहरी भागात प्रदुषणाने विळखा घातला असून धुळीचे साम्राज्य, कचऱ्याचे ढिग, नविन बांधकामे होत असताना त्यातून निघणारे डेब्रिज, प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर त्यामुळे शहरी भागात पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, शहरी भागात डंपिंग ग्राऊंडमुळे निर्माण झालेला प्रश्न, डंपिंग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध नसणे, झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्यास होत असलेला विलंब, जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत रखडलेली प्रकरणे, पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयातील रिक्त पदांमुळे व अद्ययावत उपकरणांअभावी रुग्णांना उपचार देण्यात येणाऱ्या अडचणी, स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत शासनाने दाखविलेल्या उदासिनतेमुळे अनेक प्रकल्प रखडलेले असणे, मुंबई महापालिकेच्या के/पश्चिम वॉर्डातील जुहूतारा रोड येथील "सो हो हाऊस" या पंचतारांकित हॉटेलचे बांधकाम करतांना कोस्टल रेग्युलेशनचे झालेले उल्लंघन, २ चटईक्षेत्र निर्देशांक मिळत असताना २.५ जास्त चटई क्षेत्र देऊन दिलेले भोगवटा प्रमाणपत्र, सदर हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात झालेले अनधिकृत बांधकाम, स्थानिक नगरसेवकांनी महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारी, माजिवडे (जि. ठाणे) येथील कांदळवन-तिवरे नष्ट करुन रुस्तमजी अर्बेनिया या इमारतीचे झालेले बांधकाम, पर्यावरण कायद्यांचे झालेले उल्लंघन, या इमारतींसमोर अशाच प्रकारचे झालेले अनधिकृत बांधकाम, मुंबईतील वांद्रे (पूर्व) विभागातील रखडलेले पुनर्विकास प्रकल्प, परभणी नगरविकास विभागाच्या अमृत-२ अभियान योजनेंतर्गत येलदरी समांतर पाणीपुरवठा योजना, भुयारी गटार योजना,

डंपिंग ग्राउंड, डिगी नाला खोलीकरण व रुंदीकरण, भिमनगर येथील अंडरपास रस्ता आणि महापालिका क्षेत्रात नवीन नाट्यगृह बांधणे या विकास कामांच्या प्रस्तावास जुलै, २०२२ ते जानेवारी, २०२३ दरम्यान राज्यस्तरीय उच्चधिकार समितीने दिलेली मान्यता, सदर प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप उपरोक्त विकास कामांना उपलब्ध न झालेला निधी, निधीअभावी गेल्या २-३ वर्षांपासून सदर योजनांची रखडलेली कामे, ठाणे शहरातील नागरिकांनी क्लस्टर योजनांना केलेला तीव्र विरोध, विरोध डावलून नागरिकांच्या घरांवर त्यांना सुचना न देता नोंदणी क्रमांक टाकण्यात येणे. ठाणे जिल्हा झोपडपट्टी पुर्नविकास योजनेचा उडलेला बोजवारा, या योजनेत झालेली अनियमितता व भ्रष्टाचार, ठाणे म.न.पा. आणि महसूल विभागात झालेला भ्रष्टाचार, पुणे जिल्ह्यात विविध प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या भुखंड वाटपात झालेला भ्रष्टाचार, राज्यातील देवस्थान इनाम जमिनींची परस्पर विक्री करुन झालेला भ्रष्टाचार, विविध महसूल कायद्यांमध्ये आवश्यक असलेल्या कालबद्ध सुधारणा, नामदेववाडी को-ऑप. सोसायटी, फॉरजेट स्ट्रीट, मुंबई या सोसायटीचा मागील १५ वर्षांपासून रखडलेला पुर्नविकास, बांधकाम कामगार मंडळातील विविध वस्तु वाटपात झालेला भ्रष्टाचार तसेच मंडळाच्या सचिवाची नियमबाह्य केलेली पुर्ननियुक्ती, कोकणातील विकास कामांसाठी गेल्या ३ वर्षापासून न देण्यात आलेला निधी, कोकणात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्लॅनला गेल्या दोन वर्षात न देण्यात आलेली मंजुरी, पावसामुळे नादुरुस्त झालेल्या कोकणातील साकव तसेच पुलांची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता, तसेच शाळा इमारती, अंगणवाडी इमारती, ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींसाठी निधी मंजूर करण्याची आवश्यकता, अतिवृष्टीमुळे कोकणात रस्ते खराब होण्याचे प्रमाण अधिक असल्याने रस्त्यांसाठी विशेष निधीची आवश्यकता, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे अत्यंत धिम्या गतीने सुरु असलेले काम, मे, २०२५ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे व त्यामुळे वाढलेले अपघाताचे प्रमाण, राज्यातील तिर्थक्षेत्रांना जोडणारा "'शक्तीपीठ महामार्ग" बांधण्याची शासनाची योजना, राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणारा सदर महामार्ग, तिर्थक्षेत्रांकडे जाण्यासाठी अगोदरच असलेले रस्त्यांचे जाळे, सदर महामार्गाला राज्यातील जनतेचा असलेला विरोध, तसेच गेल्या काळात राज्याच्या आरोग्य खात्यातील आणखी एक गंभीर प्रकरण उघडकीस येणे, लसींच्या साठवणुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या कोल्ड चेन उपकरणांच्या तब्बल ६२ कोटींच्या टेंडर प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येणे, खुल्या बाजारातील किंमतीच्या चार ते पाचपट दरात खरेदी करुन अधिकारी आणि ठेकेदारांनी सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणे, सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी काढलेल्या RT १४५ क्रमांकाच्या ५६ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत मोठी अनियमितता आणि संगनमत असणे, आवश्यक वैद्यकीय उपकरणे आणि साहित्याच्या खरेदीत झालेला घोटाळा, जीईएम पोर्टलवर या यंत्राची किंमत सुमारे ४ लाख ४८ हजार रुपये इतकी असणे, हेच यंत्र आरोग्य विभागाने प्रत्येकी सुमारे ६ लाख १० हजार रुपये दराने खरेदी करणे, आरोग्य विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी आणि खनिकर्म विभागातील जिल्हा खनिकर्म अधिकारी व ठेकेदार संस्थेने संगनमताने कुठलीही विहित खरेदी प्रक्रिया राबविली नसल्याचे दिसून येत असून यंत्रसामुग्रीची बाजारातील किंमतीची शहानिशा न करता

अधिकच्या दराने खरेदी करण्यात येणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पदभरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थींना शुल्क भरण्यात अडचणी येणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दहा : **(मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, डॉ. संजय कुटे, सर्वश्री अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, ॲड. राहुल कुल, डॉ. तानाजी सावंत, श्री. संजय बनसोडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री दिपक केसरकर, चेतन तुपे, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, शेखर निकम, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री राजेंद्र गावित, प्रकाश सोळंके, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री विजय शिवतारे, अनिल पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री शांताराम मोरे, सुधीर मुनगंटीवार, राजकुमार बडोले, किशोर पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती सुलभा गायकवाड, सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश सुर्वे, गोपीचंद पडळकर, नरेंद्र भोंडेकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रशांत बंब, निलेश राणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेश शिंदे, दिलीप बनकर, प्रवीण दटके, संजय गायकवाड, प्रदीप जैस्वाल, हरिष पिंपळे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, चंद्रकांत नवघरे, डॉ. तुषार राठोड, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री सचिन पाटील, सुमित वानखेडे, चंद्रकांत सोनवणे, सुहास कांदे, अभिमन्यू पवार, शंकर मांडेकर, चंद्रदिप नरके, सुनिल कांबळे, काशिनाथ दाते, महेंद्र दळवी, भिमराव तापकीर, नारायण कुचे, नरेंद्र मेहता, महेंद्र थोरवे, विजयसिंह पंडित, अशोक पाटील, किसन कथोरे, हिरामण खोसकर, बालाजी कल्याणकर, संजय केळकर, ज्ञानेश्वर कटके, संतोष बांगर, मोहन मते, विलास तरे, संतोष दानवे, विश्वनाथ भोईर, उमेश यावलकर, चंद्रकांत पाटील, किशोर जोरगेवार, आमश्या पाडवी, महेश लांडगे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, शरद सोनवणे, समीर कुणावार, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री अमित साटम, मुरजी पटेल, दिलीप लांडे, योगेश सागर, तुकाराम काते, अमोल पाटील, ॲड. पराग अळवणी,**

**सर्वश्री किरण सामंत, सुहास बाबर, विठ्ठल लंघे, प्रकाश भारसाकळे, बाबुराव कदम-कोहळीकर, सत्यजित देशमुख, सुरेश धस, बबनराव लोणीकर, समाधान आवताडे, आनंद तिडके, हिकमत उढाण, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री अमोल खताळ, राजेश मोरे, मंगेश चव्हाण, विलास भुमरे, मिहिर कोटेचा, पराग शाह, मोनिका राजळे, अनुपभैय्या अग्रवाल, समीर मेघे, प्रशांत ठाकूर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय उपाध्याय, राजन नाईक, राणाजगजितसिंह पाटील, राजेश पवार, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रताप अडसड, सुभाष देशमुख, राजेश वानखडे, विजय देशमुख, राजेश बकाने, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री देवेंद्र कोठे, सचिन कल्याण-शेट्टी, श्याम खोडे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, अमल महाडिक, शंकर जगताप, चैनसुख संचेती, केवलराम काळे, हेमंत रासने, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, श्री. रत्नाकर गुट्टे, कॅ. आर. तमील सेल्वन, कृष्णा खोपडे, शिवाजी पाटील, काशिराम पावरा, दिलीप बोरसे, चरणसिंग ठाकूर, किसन वानखेडे, सुधीर गाडगीळ, विजय रहांगडाले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमोल जावळे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल आवाडे, राघवेंद्र पाटील, संजय पुराम, राजू तोडसाम, मनोज घोरपडे, किर्तीकुमार भांगडिया, श्रीमती सई डहाके, सर्वश्री रमेश कराड, संभाजी निलंगेकर-पाटील, सुरेश भोळे, विनोद अग्रवाल, रविशेठ पाटील, तान्हाजी मुटकुळे, प्रविण तायडे, शिवाजी कर्डिले, भिमराव केराम, श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात परकीय थेट गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असणे, शासनाने स्टार्टअप युको सिस्टीम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंडस्' तयार केला असून त्यायोगे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार असणे, सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनली असणे, समृध्दी महामार्गामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांचा भूगोल व अर्थकारण बदलणार असणे, दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारातून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १६ लाख रोजगार निर्मिती अपेक्षित असणे, नवीन औद्योगिक धोरणातून सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच अंतराळ, संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्याचे नियोजन असल्याने राज्यातील तरुणांना रोजगारांच्या नव्या संधी उपलब्ध होणार असणे, पूर्व व पश्चिम विदर्भात औद्योगिक व परकीय गुंतवणूक करण्याची व कापूस उत्पादकांच्या आत्महत्या रोखण्याकरिता कापड उद्योगास चालना देण्याची आवश्यकता, राज्यातील मुंबई, नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, संभाजीनगर इ. मधील शहरी भागात वारंवार वीज खंडीत होणे, अनियमित पाणीपुरवठा, मलनि:स्सारण प्रकल्पांची कमतरता, भुयारी गटारे इ. मुलभूत नागरी समस्या भेडसावत असल्याने त्यांचे निराकरण करण्याकरिता तातडीने लक्ष देण्याची व प्रारुप विकास आराखड्यामध्ये त्याबाबत तरतूद करण्याची आवश्यकता, महिला सक्षमीकरणासाठी राज्यात आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार असणे, महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलांना आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात येणे, महिलांच्या आरोग्याबाबतच्या समस्यांचे संवेदनशीलपणे निवारण करणे, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, मुलींमध्ये शिक्षणाचे

प्रमाण वाढविणे, लैंगिक आणि शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करणे, पंचायत राज पद्धतीत महिला नेतृत्वाचा सहभाग वाढविणे, महिलांना आर्थिक सक्षम करणे इ. या अभियानाची उद्दीष्ट असणे, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पावनपर्वात राज्यातील महिला स्वयंसिध्दा होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना सुरु करण्यात आली असणे, या योजनेंतर्गत १५ एप्रिल, २०२५ पर्यंत ५२ महिलांना एकूण २ कोटी ३४ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले असणे, राज्यातील महिलांमध्ये 'जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ तयार करणे' आणि नोकरी मागणाऱ्याऐवजी नोकऱ्या देणारे नागरिक घडविणे यासाठी महिलांचे योगदान निर्णायक ठरणार असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी तत्त्वावरील महामंडळासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली असणे, मेंढपाळांसाठी कर्ज योजना, पावसाळ्यात चराई रान राखून ठेवणे, राज्यातील धनगर वाड्यांना मुख्य रस्त्यांशी जोडणे, धनगर समाज बांधवांसाठी दरवर्षी २५ हजार घरे बांधणे इ. धोरण राबविण्यात येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून राज्यातील विविध ७ तिर्थस्थळांच्या विकासासाठी ५,५०३ कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली असणे, अहिल्यानगर येथे मुलींसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आली असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मृतीस्थळांचे जतन व संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, 'विकसित भारत व विकसित महाराष्ट्र' घडविण्यासाठी अधिक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अकरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्र. १ ते ३)**

**(१) श्री. मोहन मते, वि.स.स.**

"जव्हार (जि. पालघर) नगर परिषदेतील विकास कामांना तांत्रिक मान्यता न देता शासकीय निधीचा केलेला अपहार" या विषयावरील श्री. मंगेश कुडाळकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २६९ ला दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यात जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा करणेबाबत" या विषयावरील श्री. राहुल आवाडे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७०८९ ला दिनांक ०३ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) श्री. संजय केळकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक विकास प्रकल्पांना महारेराने बजाविलेल्या नोटीसा" या विषयावरील श्रीमती सरोज अहिरे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५०० ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**अशासकीय कामकाज**

**बारा : अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ :-**

**(मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके) (क्रमांक १ व २)**

(१) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५.

(२) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १५ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.